मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 17 जुलै 2025 | पान- 1

# 'वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क' लवकरच खुले

## सात आश्चर्यांच्या प्रतिकृतींसह 17 ऐतिहासिक वास्तू; उद्यानाचे सुमारे 90 टक्के काम पूर्ण



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने टाकाऊतून टिकाऊ (वेस्ट टू बेस्ट) संकल्पनेअंतर्गत पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानात 'वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क' उभारण्यात येत आहे. त्यामध्ये विविध विभागांतील टाकाऊ भंगार वस्तूंपासून या पार्कमध्ये जगातील सात आश्चर्यांच्या प्रतिकृतींसह १७ ऐतिहासिक वास्तूंच्या प्रतिकृती तयार केल्या जात आहेत. या उद्यानाचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले असून, लवकरच ते शहरवासीयांसाठी खुले केले जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका भंगार व टाकाऊ साहित्यातून 'वंडर वर्ल्ड' ही संकल्पना राबवित आहे. उद्याने अधिक आकर्षक करण्यासाठी पाणीपुरवठा व कार्यशाळा विभागांतील टाकाऊ लोखंडी साहित्यातून आकर्षक कलाकृती तयार करण्यात आल्या आहेत. पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानात साकारण्यात येत असलेल्या 'वर्ल्ड वंडर' पार्कचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. पार्कसाठी ११ कोटी नऊ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याचा ७५ टक्के खर्च महापालिका व २५ टक्के खर्च ठेकेदाराकडून केला जात आहे. या उद्यानाचे संचालन, देखभाल व दुरुस्ती संबंधित ठेकेदार करणार आहे. या उद्यानास प्रवेश शुल्क असणार आहे. त्यातून उपलब्ध झालेले उत्पन्न महापालिकेच्या उद्यान विभागास मिळणार आहे.

दरम्यान, शहरातील उद्यानांमध्ये 'वेस्ट टू बेस्ट' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यात पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यानात डायनासोर पार्क साकारण्यात आले. त्यात डायनासोर प्रजातीच्या १४ प्रतिकृती बसविण्यात आल्या आहेत. त्याची माहिती इंग्रजी व मराठीत दर्शविण्यात आली आहे. लिनिअर उद्यानाच्या कडेला जुन्या काळातील वाहनांच्या आठ प्रतिकृती लावण्यात आल्या आहेत. संभाजीनगर, चिंचवड येथील शिव शाहू शंभू उद्यानात 'बॉलिहूड' पार्क साकारले जात आहे. त्यात हिंदी व मराठी चित्रपटातील प्रसिद्ध प्रसंगावर आधारित कलाकृती तयार केल्या जात आहेत.

### 17 ऐतिहासिक वास्तूंच्या प्रतिकृती

» टाकाऊ वस्तूंपासून उभारण्यात येत असलेल्या पिंपळे सौदागर येथील उद्यानात १७ ऐतिहासिक वास्तूंची प्रतिकृती असणार आहेत. ताजमहल, आयफेल टॉवर, बुर्ज खलिफा, लिनिंग टॉवर ऑफ पिसा, सिडनी ऑपेरा हाऊस, अंजठा कव्ह, ला सागराडा फॅमिलीया, चिचेन इतजा, पिरॅमिड ऑफ गिझा, पेट्रा ऑफ जॉर्डन, कोलोसियम ऑफ रोम, बिग बेन ऑफ लंडन, अकोर वट ऑफ कंबोडिया, हंपी चारियट, स्टॅच्यू ऑफ लिबर्टी, ट्रेव्ही फाउंटन आणि माऊंट रश्मोर आदी जगप्रसिद्ध कलाकृती साकारण्यात आल्या आहेत.

# वीज समस्याने रूपीनगर चे नागरिक हैराण

## मागील एक महिन्यांपासून रूपीनगर परिसरात वीज समस्यांमुळे सर्व हैराण



**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील एक महिन्यांपासून रूपीनगर परिसरात वीज समस्यांमुळे सर्व हैराण आहेत. सकाळी गेलेली वीज पाच ते सहा तास गायब असते, त्यामुळे नागरिकांची अनेक कामे खोळंबली जात आहेत. शिवाय परिसरातील लघुउद्योजकांचेही मोठे नुकसान होते आहे. वीज समस्येचा प्रश्न तत्काळ मार्गी लावावा अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

शैक्षणिक क्लासेस, लघुउद्योजक, वर्क फ्रॉर्म होम तसेच इतर कामांनाही वीज समस्यामुळे नुसकसान होते आहे. मागील एक महिन्यांपासून सकाळी वीज जाण्याचे सत्र सुरुच आहे. एकदा वीज गेली की, सहा ते सात तास पुन्हा येत नाही. महावितरणच्या अधिकाऱ्यांशी याबाबत नागरिकांनी चर्चा केली आहे. मात्र अजूनही वीज समस्या कायम सुरु आहे. पंचगंगा, भैरवनाथ, हनुमान या सोसायट्यांसह परिसरात वीज समस्या मोठी आहे.



“ मागील एक महिन्यापासून सातत्याने सहा ते सात तास वीज नसते. त्यामुळे गृहिणींना घरातील काम करताना, पाणी मोटर, लघुउद्योजकांना, क्लासेस घेणाऱ्या अशा सर्वांना नाहक त्रास आणि नुकसान सहन करावे लागते आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ यावर मार्ग काढावा.

- शितल वर्णेकर, स्थानिक.



“ वीज समस्येने परिसरातील नागरिक, लघुउद्योजक, गृहिणी त्रस्त झाल्या आहेत. लघुउद्योजकांचे आर्थिक नुकसान मोठे होते आहे. मागील एक महिन्यांपासून वीज समस्यांने सर्व नागरिक त्रस्त आहेत. केबलचे काही कामे प्रलंबित आहेत. केबल भूमिगत केल्यास अडचण दूर होईल. सोसायटीतील सद्याची समस्या लवकरात-लवकर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी मार्गी लावावी.

- धनंजय भालेकर, स्थानिक नागरिक.

# ‘नदीकाठ सुधार’बाबत न्यायालयाने दिला निर्णय!

## वृक्षतोडीबाबत दाखल करण्यात आलेली जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या नदीकाठ सुधार प्रकल्पातील वृक्षतोडीबाबत दाखल करण्यात आलेली जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली. यामुळे या प्रकल्पातील अडचण दूर झाली आहे.

ही याचिका फेटाळताना याचिकाकर्त्यांना पुढील वृक्षतोड व पर्यावरण विषयक नियमांचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित प्रस्तावांवर आक्षेप नोंदविण्याची मुभा न्यायालयाने त्यांना दिली आहे. दरम्यान महापालिकेने २७ एप्रिलपर्यंत ५ हजार तर २७ एप्रिल ते ११ जुलै या कालावधीत २ हजार ३६९ अशी एकूण ७ हजार ४६९ झाडे लावली आहेत.



पुणे महापालिकेच्या वतीने शहरातून वाहणाऱ्या मुळा मुठा नदीचा ४४ किलोमीटरचा काठ सुशोभित करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या कामासाठी ४ हजार ७०० कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर करून घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मार्च २०२१ मध्ये या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले होते. पहिल्या टप्प्यात संगमवाडी ते बंडगार्डन पूल आणि बंडगार्डन पूल ते मुंढवा पूल अशा टोन टप्प्यात काम सुरू आहे.

या प्रकल्पासाठी नवीन वृक्ष लावण्यात आले नसल्याबद्दल शाल्वी पवार व तन्मयी शिंदे यांनी उच्च न्यायालयात धाव घेत जनहित याचिका दाखल केली होती. ही याचिका फेटाळत न्यायालयाने ११ जुलै रोजी आदेश दिला. नदीकाठ सुधार विकास प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे असे महापालिकेने न्यायालयामध्ये सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात नमुद केले आहे. त्यामध्ये किती वृक्ष काढण्यात आले, किती वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात आले, कुठल्या प्रकारचे नवीन वृक्ष लावण्यात आले. त्यांची संख्या किती आहे, त्याच्या देखभाल दुरुस्तीबाबत काय केले जात आहे. याविषयीचा उल्लेख प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद करण्यात आला होता.

त्यावर महापालिकेने लावलेल्या झाडांची व्यवस्थित देखभाल दुरुस्ती व्हावी, याकडे गांभीर्याने लक्ष देण्याबाबत न्यायालयाने महापालिकेस सांगितले आहे, असे महापालिकेच्या विशेष प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता बिपिन शिंदे यांनी सांगितले.

### काय आहे नक्की प्रकल्प

» शहरातून वाहणाऱ्या नद्यांची स्थिती फारशी चांगली नाही. या नद्यांना सध्या नाल्याचे स्वरूप आले आहे. वाढते शहरीकरण, प्रक्रीया न झालेले सांडपाणी नद्यांमध्ये सर्रासपणे सोडले जाणे, नदीपात्रात कचरा टाकणे यामुळे नद्यांमध्ये प्रदूषण वाढलेले आहे. पुणे पालिकेच्या हद्दीत साधारणपणे ४४ किलोमीटर नदी आहे. त्यापैकी २२.२ किलोमीटर मुळा तर १०.४ किलोमीटर मुठा नदी आणि ११.८ किलोमीटर मुळा-मुठा नदी आहे. या नद्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी महापालिकेने नदी सुधार प्रकल्प हाती घेतला आहे.

# तुकोबांची पालखी ज्ञानेश्वर माऊलींच्या भेटीला

## 2008 नंतर 17 वर्षांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी येत्या रविवारी आळंदीत

**पुणे | प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव आणि जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळ्याचे औचित्य साधून संत तुकाराम महाराजांची पालखी परतीच्या प्रवासात आळंदीत मुक्कामी जाणार आहे. २००८ नंतर १७ वर्षांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची पालखी येत्या रविवारी (२० जुलै) आळंदीत संत ज्ञानेश्वर माऊलींच्या भेटीला येणार आहे. हा सोहळा अद्वितीय होण्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीकडून जय्यत तयारी सुरू आहे.



जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे धाकटे चिरंजीव तपोनिधी नारायण महाराज यांनी १६८५ मध्ये पालखी सोहळा सुरू केला. तुकोबांचा पालखी सोहळा आळंदीमार्गेच प्रवास करीत होता. १६८५ ते १८३१ पर्यंत तुकोबांची पालखी आळंदी मार्गे मार्गस्थ होत होती. ही परंपरा खंडित झाल्यावर गुरु हैबतबाबा आरफळकर यांनी १८३२ मध्ये स्वतंत्रपणे संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा सुरू केला. त्यानंतर दोन्ही संतांच्या पालखीचे मार्ग बदलले. दोन्ही पालखी सोहळ्यात लाखोंच्या संख्येने भाविक सहभागी होत आहेत. २८ जुलै २००८ मध्ये संत तुकाराम महाराजांच्या ४०० व्या जन्मोत्सवावेळी दोन्ही पालख्यांची भेट झाली होती. तुकोबांची पालखी आळंदी मुक्कामी गेली होती.

यंदा संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव आणि संत तुकाराम महाराजांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळा आहे. यानिमित्त या दोन पालख्यांची भेट होण्यासाठी यावर्षी सोहळा आळंदीला आणण्याची मागणी आळंदी देवस्थानने देहू देवस्थानला केली होती. याबाबतचे पत्र आळंदी देवस्थानचे सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे आणि विश्वस्त चैतन्य महाराज कबीर यांनी देहू देवस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांना दिले होते. या निमंत्रणाचा देहू संस्थानने स्वीकार केला. माउलींची पालखी रविवारी आळंदीत दाखल होणार आहे. त्याच दिवशी संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा आळंदीत मुक्कामी येणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज या दोन पालख्यांच्या भेटीचा अनुपम सोहळा हजारो वारकऱ्यांना अनुभवता येणार आहे.

### तुकोबांच्या पालखीचा पुण्यातील एक मुक्काम रद्द

» तुकाराम महाराजांचा परतीचा पालखी सोहळा शुक्रवारी (१८ जुलै) रोजी पुण्यात दाखल होणार आहे. १८ आणि १९ जुलै असे दोन दिवस पालखी पुण्यात मुक्कामी राहणार होती. आता १९ जुलै रोजी सकाळीच पालखी सोहळा पिंपरी-चिंचवड शहरात येणार असून पिंपरीत मुक्काम असणार आहे. २० जुलै रोजी चिंचवड, आकुर्डी, भोसरी मार्गे पालखी सोहळा आळंदीत मुक्कामासाठी दाखल होईल. २१ तारखेला चिखली टाळगाव, तळवडे मार्गे पालखी सोहळा देहूला पोहचेल.

> “आळंदी देवस्थानचे निमंत्रण स्वीकारले आहे. ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव आणि तुकाराम महाराजांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त दोन्ही संतांची भेट होणार आहे.
>
> **- जालिंदर महाराज मोरे, अध्यक्ष, श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये डेंग्यूने डोकं वर काढलं

## शहरात थंडी तापाच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ होत आहे, त्यामध्ये डेंग्यू, चिकनगुनिया आजाराच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात थंडी तापाच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ होत आहे. त्यामध्ये डेंग्यू, चिकनगुनिया आजाराच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. जुलै महिन्याच्या १४ दिवसांमध्ये शहरात तब्बल २१० डेंग्यूचे संशयित रुग्ण आढळले आहेत. तर ७ जणांचे तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत.

पावसाळ्यामध्ये डेंग्यू, चिकनगुनिया, मलेरिया यासारखे आजार पसरतात. थंडी, ताप, अंगदुखी यासारखी लक्षणे असून जुलै महिन्यामध्ये ११ हजार ९२९ जणांना तीव्र थंडी ताप आला आहे. त्यामध्ये डेंग्यू सारख्या आजाराने त्रस्त असलेल्या डेंग्यू सदृश रुग्णांची संख्या तब्बल २१० आहे. ही संख्या पूर्ण जून महिन्यामध्ये २०८ होती.

या महिन्याच्या १४ दिवसांमध्येच मागील महिन्याच्या आकडा गाठल्याने चिंता वाढली आहे. तर मलेरिया पॉझिटिव्ह अहवाल येणाऱ्या रुग्णांची संख्या देखील वाढत आहे. जुलै महिन्याच्या १४ दिवसांमध्ये ४ जणांचा मलेरिया तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आला आहे.

पावसाळ्यामध्ये ठिक-ठिकाणी पाण्याचे डबके साचले. या पाण्यामध्ये डासांची उत्पत्ती होऊन हिवताप, डेंग्यू, चिकनगुनिया यासारख्या किटकजन्य आजाराची साथ येते. जून महिन्याच्या तुलनेमध्ये जुलै महिन्यामध्ये थंडी ताप व डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याने वैद्यकीय विभागाचा ताप वाढला आहे.

पावसाळ्यामध्ये किटकजन्य आजार वाढत असल्याने आरोग्य विभागाच्या वतीने डासोत्पत्ती ठिकाणे नष्ट करण्यात येतात. त्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने कंटेनर सर्वे करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी डासोत्पत्तीची ठिकाणे आढळतील तेथील आस्थापना व नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत दरम्यान, या महिन्यामध्ये मलेरियाची चार रुग्णांना लागण झाली. डेंग्यू आणि मलेरिया या दोन्ही आजारांची रुग्णसंख्या वाढत आहे. मात्र, अद्याप एकही रुग्ण अस्वस्थ अवस्थेत नाही. तसेच मृत्यू कोणाचा झाला नसल्याचे वैद्यकीय विभागाने स्पष्ट केले आहे.




### औषध फवारणी, दंडात्मक कारवाई सुरु

» शहरात डेंग्यू, मलेरिया यांसारख्या डास्न जन्य आजारांना अटकाव करण्यात येत आहे. औषध फवारणीपासून ते थेट दंडात्मक कारवाईपर्यंत आरोग्य विभागाकडून उपाययोजना राबवण्यात येत आहेत. घरगुती पातळीपासून औद्योगिक व बांधकाम स्थळांपर्यंत सखोल तपासण्या सुरू असून, यामध्ये डासाच्या उत्पत्तीला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा शोध घेऊन त्वरित कारवाई केली जात आहे.

### डासोत्पत्ती स्थानके नष्ट करण्यावर भर

» पावसाळ्यामध्ये किटकजन्य आजार वाढत असल्याने आरोग्य विभागाच्या वतीने डासोत्पत्ती ठिकाणे नष्ट करण्यात येतात. त्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने कंटेनर सर्वे करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी डासोत्पत्तीची ठिकाणे आढळतील तेथील आस्थापना व नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत असल्याचे आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

“ महापालिकेकडून डासांच्या उत्पत्तीचा बंदोबस्त करण्यासाठी सर्व स्तरावर उपाययोजना सुरु असून, डेंग्यू मलेरियासारख्या आजारावर मात करण्यासाठी नागरिकांचे सहकार्य महत्वाचे आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका.**

“ नागरिकांनी डासजन्य आजारांपासून मोठ्या प्रमाणात बचाव करण्यासाठी आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळणे घरात व आजूबाजूला पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.

**- सचिन पवार , उप आयुक्त, आरोग्य विभाग, महानगरपालिका**

# 'पीएमआरडीए'चा प्रारूप आराखडा रद्द; उच्च न्यायालयाने स्वीकारले राज्य शासनाचे प्रतिज्ञापत्र

## न्यायालयाने निर्णय देत त्या संबंधित इतर आठ अपील निकाली काढले, याबाबतच्या माहितीस संचालक सुनील मरळे यांनी दुजोरा दिला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा प्रारूप आराखडा अखेर मुंबई उच्च न्यायालयाने अंतिमतः रद्द ठरवला. याबाबत राज्य शासनाकडून प्रारूप आराखडा रद्द करत असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले होते. त्यावर न्यायालयाने निर्णय देत त्या संबंधित इतर आठ अपील निकाली काढले. याबाबतच्या माहितीस पीएमआरडीए विकास परवानगी विभागाचे संचालक सुनील मरळे यांनी दुजोरा दिला.

पीएमआरडीए प्रारूप आराखड्याबाबतची न्यायालयीन प्रक्रिया गेल्या दोन वर्षांपासून अधिक काळ सुरू होती. न्यायालयाने जानेवारी 2024 मध्ये राज्य शासन, प्राधिकरण आणि नियोजन समितीला हरकती व सूचनावर ही निर्णय देण्यास मनाई केली होती. त्यामुळे 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्यात आली. त्याच अनुषंगाने झालेल्या सुनावणीमध्ये बहुचर्चित प्रारूप आराखडा अखेर रद्द होणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे.

उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत राज्य शासनाच्या वतीने महा अधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी प्रारूप आराखडा रद्द करत असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. ॲड. सूरज चकोर यांनी याचिकाकर्त्यांतर्फे युक्तिवाद केला. रवी कदम यांनी पीएमआरडीएची बाजू मांडली.

न्यायलायाच्या निर्देशनास आणून दिले की, राज्य सरकारने 15 दिवसांत प्रारूप विकास आराखडा घाई करून प्रकाशित केला आहे. त्यात पायाभूत सुविधांचा एकत्रित विकास आणि त्याचे व्यवस्थित नियोजन होईल व स्थानिक पातळीवर अडचणी काय आहे हे लक्षात घेण्यात आले नव्हते. हे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईमध्ये हा प्रारूप आराखडाच रद्द करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर ही प्रक्रिया पार पडली.

राज्य शासनाकडून प्रारूप आराखडा रद्द करत असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले होते. त्यावर न्यायालयाने निर्णय देत त्या संबंधित इतर आठ अपील निकाली काढले. याबाबतच्या माहितीस पीएमआरडीए विकास परवानगी विभागाचे संचालक सुनील मरळे




### काय आहे प्रकरण..

» पीएमआरडीएने प्रारूप आराखडा तयार करण्यासाठी 16 जुलै 2021 रोजी महानगर नियोजन समिती गठीत केली होती. पुणे महानगर नियोजन समितीमध्ये एकूण 45 सदस्यांमधून 30 सदस्य हे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि महानगरात सामावलेल्या ग्रामपंचायतींच्या सरपंचांमधून निवडून येणे अपेक्षित होते. तथापि ते न करता संपूर्ण 30 पदे रिक्त ठेवून प्रारूप आराखडा 30 जुलै 2021 रोजी प्रकाशित करण्यात आला. तसेच, नियोजन समितीचे मत विचारात घेण्यात आले नव्हते.

# कडबनवाडीची ग्रासलँड सफारी टाकतेय कात!

## कडबनवाडी परिसरातील खुरट्या, गवताळ वनातील वन्यजीवन दाखविण्यासाठी वन विभागाने खास सफारी उपक्रम सुरू केला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

हिरव्यागार जंगलातील वळत जाणारी वाट... त्यात उघड्या जीपमध्ये दुर्बिणी सरसावून बसलेले निसर्गप्रेमी... मधूनच जमिनीवरूनच वेगात तरंगत जाणारा चिंकारांचा कळप... अवचित दिसलेला तरस, ससा, कोल्हा आणि नशीब जोरदार असेल तर लांडग्याचे झालेले दर्शन... हे काही मध्य प्रदेश किंवा कर्नाटकातील एखाद्या प्रसिद्ध अभयारण्यातील चित्र नव्हे, तर पुण्यापासून अवघ्या 135 किलोमीटर अंतरावरच्या कडबनवाडीतील आहे.

पुणे-सोलापूर रस्त्यावरील भिगवणजवळच्या कडबनवाडी परिसरातील खुरट्या, गवताळ वनातील वनश्री अन् वन्यजीवन दाखविण्यासाठी वन विभागाने खास सफारी उपक्रम सुरू केला आहे.

ऑक्टोबर 2023 मध्ये पुणे वन विभागाने पुढाकार घेऊन महाराष्ट्रातील पहिला असा गवताळ सफारी प्रकल्प असून, त्या प्रदेशातील जैवविविधतेचे महत्त्व लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी आणि त्याचे संवर्धन करण्यासाठी हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. स्थानिकांचा समावेश असलेल्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीला यासाठी प्रशिक्षण देण्यात आले आहे. तिकिटांच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न या समितीला मिळते. ज्यामुळे स्थानिक लोकांचा प्रकल्पात थेट सहभाग आणि फायदा होतो.

वन विभागाच्या वतीने ऑक्टोबर 2023 मध्ये हा प्रकल्प सुरू केला आहे. जुलै 2025 पर्यंत 5 हजार 296 सफारीमधून 15 हजार 36 पर्यटकांनी भेट दिली असून, वन विभागाला 40 लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. त्यामध्ये चालक, जिप्सीमालक, गार्ड, स्थानिक नागरिक यांना त्यातून 21 लाख 47 हजार रुपये मिळालेआहेत. पुणे-सोलापूर रस्त्यावरील भिगवणजवळच्या कडबनवाडी परिसरातील खुरट्या, गवताळ वनातील वनश्री अन् वन्यजीवन दाखविण्यासाठी वन विभागाने खास सफारी उपक्रम सुरू केला आहे.

वन विभागाच्या वतीने कडबनवाडीबरोबरच बारामती तालुक्यातील शिर्सुफळ येथे देखील असाच प्रकल्प उभारण्यात आलेला असल्याचे वन विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक महेश ताटे यांनी सांगितले.



### काय आहेत वैशिष्ट्ये

- कडबनवाडी सफारीत कोल्हा, चिंकारा (इंडियन गझेल), लांडगा, ससे, खोकड, तरस (हायना) यांसारखे प्राणी आणि विविध प्रकारचे गवताळ प्रदेशातील पक्षी तसेच सरपटणारे प्राणी यांचा समावेश.
- रेन क्वेल, अॅशी-क्राउंड स्पॅरो लार्क, ग्रे-नेक्ड बंटिंग आणि पेंटेड फ्रँकोलिन यांसारखे 330 हून अधिक प्रजातींचे पक्षी.
- कडबनवाडी गेटपासून सुमारे 30 किलोमीटरचा सफारीचा मार्ग.
- सफारीमुळे स्थानिक कुटुंबांना रोजगार, स्थानिक लोकांना गाइड म्हणून प्रशिक्षण.
- सफारीसाठी सकाळी 6 ते 9 आणि दुपारी 3 ते 6 अशी वेळ.

> “ गवताळ प्रदेश ही पडीक जमीन नाही. या प्रदेशातील परिसंस्था वेगळी असते. पर्यटक वाघ, सिंह बघायला जातात. पण, त्यांनी या गवताळ प्रदेशाचा, तेथील वनस्पतींचाही आनंद घेणे आवश्यक आहे. या हेतूने हा उपक्रम सुरू झाला असून, गवतामध्ये राहणाऱ्या वन्यजीवांचे दर्शन या सफारीमधून होणार आहे.
>
> **- अनुज खरे, माजी मानद वन्यजीवरक्षक**

> “ कडबनवाडी ग्रासलँड सफारी या ठिकाणी विविध योजनांचे नियोजन केले असून, वेगवेगळ्या साहित्यांची आवश्यकता आहे. त्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये मांडण्यात आला असून, चर्चा करण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळालेला आहे. सध्या तीन जिप्सी घेण्यात आलेल्या आहेत. सकाळी तीन तास आणि दुपारी तीन तास, अशा दोन वेळांमध्ये ही सफारी सुरू असून, त्याला आत्तापर्यंत खूप चांगला प्रतिसाद पर्यटकांनी दिलेला आहे. मुख्य वनसंरक्षक आणि उपवनसंरक्षक यांच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू आहे.
>
> **- महेश ताटे, सहाय्यक वनसंरक्षक, पुणे वन विभाग**

# भीमाशंकर विकास आराखड्यात खेड तालुक्याची उपेक्षाच

## जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन : खेड तालुक्यातील ज्योतिर्लिंग श्रीक्षेत्र भीमाशंकर विकास आराखड्यात खेड तालुक्यातील भोरगिरी परिसराचा समावेश करून विकास करावा

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील ज्योतिर्लिंग श्रीक्षेत्र भीमाशंकर विकास आराखड्यात खेड तालुक्यातील भोरगिरी परिसराचा समावेश करून विकास करावा, अशी मागणी खेड तालुक्यातील नागरिकांनी केली आहे, याबाबत पुणे जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

यावेळी खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती व भोरगिरीचे माजी सरपंच विठ्ठल वनघरे, संतोष भांगे आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद केले आहे की, श्रीक्षेत्र भीमाशंकर हे भोरगिरी खेड तालुक्यात असून या देवस्थानच्या नावाखाली आलेला सर्व निधी आंबेगाव तालुक्याच्या विकासासाठी वापरला जातो आहे, त्यात खेड तालुक्याचा विचार का होत नाही? भीमाशंकर विकास आराखड्यात भोरगिरी येथील प्रवित्र कोटेश्वर भीमानदी घाट, भोरगडाचा विकास महत्त्वाचा असून त्यासाठी निधी उपलब्ध झाला पाहिजे, भीमाशंकर ते भोरगिरी हे अंतर केवळ 5 किलोमिटर आहे.

खेड तालुक्यात 12 ज्योतिर्लिंगापैकी एक भीमाशंकर ज्योतिर्लिंग आहे.ते खेड तालुक्यात आहे; मात्र त्याचा उर्वरित परिसर आंबेगाव तालुक्यात येतो. आतापर्यंत विकास आराखड्यात केवळ आंबेगाव तालुक्यातील भागाचा विकास झाला आहे. खेड तालुक्यात असलेली महत्त्वाची ठिकाणे विकासापासून दुर्लक्षित आहेत. दरम्यान, येथे भीमानदी उगमस्थान, गुप्त भीमाशंकर व साक्षी विनायक अशी विशेष पौराणिक स्थाने आहेत. या स्थानांचा विचार करण्यात यावा, भीमाशंकर देवस्थानची कार्यकारिणी बरखास्त झाली असून एवठे मोठे देवस्थान असुनही देवस्थानल अध्यक्ष नाही. कार्यकारणही लवकरात लवकर घेणे गरजेचे आहे.



### राजकारण विकासाला आडवे

- भीमाशंकर हे भोरगिरी ग्रामपंचायतीच्या हद्दीत येते. भीमाशंकरसह इतर अनेक ठिकाणे ही भोरगिरी परिसरात आहेत पर्यटनाच्या दृष्टीने आणि स्थानिकांना रोजगाच्या दृष्टीने आतापर्यंत या भागाचा विकास होणे अपेक्षित होते मात्र तसे झाले नाही कधीकधी खेड-आंबेगाव तालुक्यातील राजकारण विकासाला आडवे आले. त्यामुळे खेड भोरगिरी परिसराचा विकास मागे पडला.